
भारतीय
साहित्य
विचार
संपादक
प्रा. डॉ. तुषार चांदवडकर

अथर्व पब्लिकेशन्स

**भारतीय साहित्य विचार**

[ Bhartiya Sahitya Vichar ]

© सर्व हक्क सुरक्षित

P Book ISBN : 978-93-90288-64-9

पुस्तक प्रकाशन क्र. ७७३

**प्रकाशक**

युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**

**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४००१.

**संपर्क :** ९४०५२०६२३०

**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,

तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५००१.

**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

**ई-मेल :** atharvapublications@gmail.com

**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** २४/०५/२०२०    **अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य :** २००/-

**E-Book *available on***

**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

---

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत

# अनुक्रमणिका


१) साहित्याची संकल्पना .................................. ९
- डॉ. सुभाष आहेर

२) साहित्याचे प्रयोजन .................................. २२
- डॉ. संजय शिंदे

३) साहित्याची निर्मिती प्रक्रिया आणि ........................ ३९
साहित्यनिर्मितीच्या शक्ती
- डॉ. धनराज धनगर

४) साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व व गुणविशेष ...................... ५०
- डॉ. अरुण कोळेकर

५) साहित्य आणि समाज–जीवनमूल्ये आणि साहित्यमूल्ये, ..... ७५
साहित्य वाचनाची प्रक्रिया आणि आवश्यकता
- डॉ. वर्षा तोडमल

६) साहित्याची भाषा ...................................... ८९
- डॉ. दीपक गायकवाड

७) शैलीविषयक स्थूल चर्चा (लेखक, आशय, ................ १०३
साहित्यप्रकार या अनुरोधाने चर्चा)
- डॉ. तुषार चांदवडकर

# साहित्याची भाषा

- डॉ. दीपक गायकवाड

**प्रास्ताविक**

भाषा हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मानवाला मिळालेली एक देणगी आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. भाषेचा वापर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात होत आहे. जेथे जेथे मानवी वस्ती आहे, तेथे भाषा आहे. जेथे भाषा नाही तेथे विचार नाही. सुलभ देवाणघेवाण नाही; किंबहुना प्रगती नाही. सकाळी उठल्यापासून संध्याकाळपर्यंत माणूस भाषेचा उपयोग करीत असतो. अगदी स्वप्नातसुद्धा तो भाषेच्या माध्यमातून मनातल्या मनात ऐकत असतो किंवा तोंडातून बडबड करीत असतो. आपले अनुभव- विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम भाषा करीत असते.

भाषेसाठी शब्दांची एका विशिष्ट चिन्हव्यवस्थेची गरज असते. ही चिन्हव्यवस्था अवगत झाली की माणूस भाषा शिकतो. भाषा शिकतो म्हणजे भोवतालच्या सजीव व निर्जीव वस्तूंना विशिष्ट शब्दांनी (चिन्हांनी) संबोधतो. खरेतर भाषेची निर्मिती ही साहित्यनिर्मितीसाठी झालेली नव्हती, तर मानवी जीवन सहज व सोपे व्हावे, हा हेतू त्यामध्ये असायला हवा. पण, हा हेतू काही काळानंतर बदलत साहित्यनिर्मितीपर्यंत पोहोचला व आपल्या मनातील कल्पना, अनुभव, भावना, वासना व्यक्त करण्यासाठी शब्दांचा आधार घेऊन साहित्यांत तो व्यक्त होऊ लागला. त्यामुळे भाषेचा वापर फक्त दैनंदिन जीवनात बोलण्यासाठी नाही तर जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत होऊ लागला; तो कसा ते आपण पुढे पाहूया...

**व्यवहार भाषा**

व्यवहाराची भाषा साधारणपणे दोन प्रकारची असते. एक म्हणजे, प्रत्यक्ष व्यवहारात बोलताना वापरली जाणारी भाषा व दुसरी म्हणजे, लिखित व्यवहारात वापरली जाणारी भाषा होय. प्रत्यक्ष व्यवहारात बोलताना किंवा आपले विचार मांडताना आपण एका विशिष्ट भाषेचा वापर करीत असतो. अशी भाषा आपल्या नेहमीच्या बोलण्यातल्या भाषेच्या जवळची असते. भाषेचे

अभ्यासक बोलीभाषा म्हणजेच व्यवहार भाषा मानतात. खरेतर भाषा ही शेवटी भाषाच असते. आपण आपल्या सोयीसाठी 'व्यवहार भाषा' असे नाव देतो. व्यवहाराची भाषा बोलीभाषा असते, हे मान्य केले तरी प्रत्यक्ष ती बोलीभाषेच्या जवळची मानावी लागते. जसे आपण आपल्या घरात किंवा गावात ओळखीच्या लोकांसमोर बोलत असताना सूक्ष्म फरक करीत असतो. खरेतर ती बोलीभाषा असते. पण, स्थळ-काळानुसार व्यक्तिपरत्वे त्यामध्ये बदल होत असतो. हा बदल स्वीकारून बोलली जाणारी भाषा 'व्यवहाराची भाषा' ठरते. कारण, व्यवहाराची भाषा बोलणारी व्यक्ती साक्षर किंवा निरक्षर असू शकते. दररोजच्या बोलण्यात एखादी व्यक्ती आपल्या पत्नीला माझं 'धोतार' कुठंय, असे म्हणेल. पण, तीच व्यक्ती दुकानात ते विकत घेण्यासाठी गेला तर मला 'धोतर' दाखविता का? असे म्हणेल. हे झाले एका शब्दाच्या बाबतीत. पण, असे अनेक शब्द व वाक्य तो नेहमीच्या बोलीभाषेतील न वापरता वेगळ्या स्वरूपांतील वापर करण्याकडे जास्त कल असतो. भाषेतून व्यवहारासाठी देवाणघेवाण करताना कोणीतरी हसेल किंवा नावे ठेवणार नाही, याची खबरदारी प्रत्येक वेळी घेतली जाते. पण, हेसुद्धा व्यक्तिपरत्वे घडत असते.

नित्याच्या संभाषणात व्यवहाराची भाषा असते, त्याप्रमाणे ती लिखित स्वरूपातही असते. वेगवेगळ्या संस्थांच्या सभा व त्यांची इतिवृत्ते, वृत्तपत्रीय लेखन, अहवाल, प्रशासकीय पत्रे, व्यावहारिक पत्रे, जमा-खर्च पत्रके, अर्ज इत्यादींमधून व्यावहारिक भाषेचे लिखित स्वरूप माहिती पडते. या लिखित भाषेची लिहिण्याची एक पद्धत ठरलेली असते. त्यानुसार हे लेखन होत असते. व्यवहाराची लिखित भाषा सोडली तर इतर ठिकाणी हे संदेशवहन केवळ प्रासंगिक तात्पुरत्या स्वरूपाचे असते. घटनारूप व व्यक्तिनुरूप त्याची अर्थव्यक्ती बदलत असते. व्यवहाराची भाषा ही लिंग, वयानुसार बदलते. 'आज सुट्टी आहे' असे म्हटल्यावर घरातील मुलांना आज शाळेत जायचे नाही, हे आपोआप कळते. बोलणारा, ऐकणारा व त्यातील संदेश हे तीन महत्त्वाचे घटक या ठिकाणी महत्त्वाचे आहेत. व्यक्तिपरत्वे या संदेशाचा विस्तार अवलंबून असतो. आज सुट्टी असल्यामुळे अभ्यासाबरोबर खेळायला भरपूर वेळ आहे, अशी अप्रत्यक्षपणे माहिती या संदेशातून मिळत असते.

व्यवहाराच्या भाषेविषयी भालचंद्र खांडेकर म्हणतात, ''व्यवहाराची भाषा ही समाजमनाची भाषा असते. अनेक प्रकारच्या लोकांमध्ये व्यापक क्षेत्रात ती मोठ्या प्रमाणात वापरात असते. निरक्षर आणि साक्षर लोकांच्या वापरात व्यवहारी भाषा सर्रास येते. संदेशवहन हा तिचा हेतू असल्यामुळे व्यवहाराची भाषा ही साधनरूप असूनही कित्येक वेळा साध्यरूप ठरते.''[1] व्यवहाराच्या

संदर्भसूची


१) खांडेकर, भालचंद्र, 'साहित्यविचार', अनमोल प्रकाशन, १९८७, पृ. ९१.
२) ढवळे वि. ना., 'साहित्याचे तत्त्वज्ञान', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. १७४.
३) 'साहित्यविचार', उनि, पृ. ९४.
४) 'साहित्याचे तत्त्वज्ञान, उनि, पृ. १९४.
५) 'साहित्यविचार', उनि, पृ. १०४.
६) 'तत्रैव', पृ. १०५.
७) कुलकर्णी अरविंद, 'साहित्यविचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. ९१.
८) 'साहित्यविचार', उनि, पृ. ९१.
९) खांडेकर, भालचंद्र, 'साहित्यविचार', उनि, पृ. १३६.
१०) तत्रैव, पृ. १३७.
११) तत्रैव, पृ. १३८.
१२) तत्रैव, पृ. १४१.
१३) तत्रैव, पृ. १४४.